**बक्षिस विजेत्याने बक्षिसाची मागणी सादर करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी :-**

१) मागणी पत्रातील (Form A) माहीती भरून महसूल मुद्रांक (१ रुपयाचे) (Revenue Stamp) चिकटवून त्यावर बक्षिस विजेत्याची स्वाक्षरी करुन अर्ज दोन प्रतीत दयावा. तसेच पूर्ण माहिती भरलेल्या मागणीपत्राच्या झेरॉक्सची एक प्रत सोबत जोडावी.

२) बक्षिस विजेत्याने आपले संपूर्ण नाव मागणीपत्रावर मराठी तसेच इंग्रजीमध्येही नमूद करणे आवश्यक आहे.

३) लॉटरी तिकिटामागे बक्षिस विजेत्याची स्वाक्षरी करुन नंतर त्या लॉटरी तिकिटाची झेरॉक्स काढून त्यावरही स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

४) प्रतिज्ञापत्र / क्षतिपूर्ती बंधपत्र यातील माहिती भरून स्वत:चे नाव व त्यावर स्वत:चे सही व दोन साक्षीदारांची नाव,पत्ता व त्यांच्या स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

५) मागणीपत्रासोबत बक्षिस विजेत्याचे अलिकडचे दोन फोटो स्वाक्षरीसहीत मागणी पत्रकावर चिकटवणे आवश्यक आहेत.

६) बक्षिस विजेत्याचा पॅनकार्ड नंबर व आधारकार्ड नंबर मागणीपत्रकात नमूद करून, पॅनकार्डची व आधारकार्डची सुस्पष्ट झेरॉक्स व त्यावर ही स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

७) बक्षिस विजेत्याचा दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक मागणीपत्रात नमूद करावा.

८) बक्षिस विजेत्याचा व्यवसाय / नोकरीचे नाव,निवासी पत्ता,निवासी दूरध्वनी क्रमांक नमूद करावा.

९) शासन निर्णय क्र. संकीर्ण १०१०/प्र. क्र. ६८/भाग-२/कोषा प्र ५,दि. ३१ जानेवारी,२०१३ चे सहपत्र - 'जोडपत्र - अ' (मागणीदार/पुरवठादार/अनुदानप्राप्त संस्था यांनी आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकडे माहिती सादर करण्यासाठीचा नमुना),बँकेचा तपशिल व रद्द धनादेशासह सादर करणे आवश्यक आहे.

वरील बार्बीची पूर्तता करून सदर मागणीपत्र या कार्यालयास सोडतीच्या दिनांकापासून **९० दिवसांच्या** आत सादर करणे आवश्यक आहे.